*जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला अंतर्गत कापशी तालुका अकोला जिल्हा अकोला येथे अकोला भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरीता अर्ज करणे बाबत*

जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला अंतर्गत कापशी तालुका अकोला जिल्हा अकोला येथे अकोला भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत अर्ज करण्यासाठी लागणाऱ्या अर्जाचा नमुना व भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरीता अटी व शर्ती https://dahd.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रकाशित करण्यात आलेले असून दि.०५/०७/२०२५ ते १५/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय अकोला येथे अर्ज स्वीकारण्यात येतील किवा पोस्टाने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय जिल्हा अकोला च्या वर पंचायत समिती च्या बाजूला या पत्यावर मागविण्यात आलेले आहेत.अंतिम निवड करण्याचे संपूर्ण अधिकार मा.जिल्हाधिकारी महोदय जिल्हा अकोला यांचे राहतील .

**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**
**अकोला**

Scanned with OKEN Scanner

जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला अंतर्गत कापशी तालुका अकोला जिल्हा अकोला येथे अकोला भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरीता अर्ज करणे बाबत

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| | भ्रमण ध्वनी क्र . | |
| २ | पत्ता | |
| ३ | अर्ज करणारी संस्था पशुसंवर्धन विषयक बाबी साठी नोंदणीकृत आहे काय .(असल्यास नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडावे ) | |
| ४ | पशुसंवर्धनचा व प्राणी क्लेश संबंधी कामकाजाचा अनुभव आहे काय (असल्यास अनुभवाचे पुरावे सोबत जोडावे ) | |
| ५ | मागील ३ वर्षाचा संस्थेचा प्रमाणित लेखा परीक्षणाचा AUDIT REPORT आहे काय (असल्यास सोबत जोडावा ) | |
| ६ | संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा परिक्षण झालेले आहेका (असल्यास पुरावे सोबत जोडावे ) | |
| ७ | संस्थेच्या खेळते भांडवलाचा पुरावा सोबत जोडावा | |
| | | |

Scanned with OKEN Scanner

अकोला जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समिती (SPCA) जिल्हा अकोला अंतर्गत भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरिता अर्ज मागवायचे आहेत.वृत्तपत्रामध्ये सदर निवारागृह चालविण्याकरीता अटी व शर्ती देणे आवश्यक आहे जेणेकरून योग्य संस्थेची प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरीता निवड करता येईल. वृत्तपत्रामध्ये देणे करीता खालील प्रमाणे अटी व शर्ती तयार करण्यात आलेल्या आहेत .

१) अकोला जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला अंतर्गत भटक्या प्राण्याचे निवारागृहाचे कापशी (तलाव )तालुका अकोला जिल्हा अकोला येथे बांधकाम करण्यात आलेले आहे .निवारागृह चालविण्याकरीता सदर जागा ३ वर्षा करीता भटक्या प्राण्याचे निवारागृह (मोठी जनावरे) चालविण्याकरीता निवड झालेल्या संस्थेला देण्यात येईल.सदर जागेवर भटक्या जनावरांचे उपचार व देखभाल करणेकरिता सदर निवारागृह देण्यात येणार आहे.

२) अर्ज करणारी संस्था नोंदणीकृत असावी ,कोणत्याही वैयक्तिक व्यक्तीला सदर ठिकाणी अर्ज करता येणार नाही.

३) सदर संस्था पशुसंवर्धन विषयक बाबी साठीच नोंदणी कृत असावी.

३) सदर संस्थेला पशुसंवर्धनचा व प्राणी क्लेश संबंधी कामकाजाचा अनुभव असावा.

४) अर्ज केलेल्या संस्थेला मागील ३ वर्षाचा त्यांच्या संस्थेचा प्रमाणित लेखा परीक्षणाचा AUDIT REPORT सादर करणे आवश्यक राहील.संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा परिक्षण झालेले असावे .संस्थेचे खेळते भांडवल कमीत कमी ५ लाख असावे .

५) सदर जागेवर कुठलाही मालकी हक्क गाजविता येणार नाही .

६) सदर जागेवर फक्त तात्पुरत्या स्वरूपाचे भटक्या प्रण्याकरीता निवारा शेड उभारून देण्यात आलेला आहे .तिथे कोणतेही पक्के बांधकाम करता येणार नाही ,

७)सदर जागेच्या वापरामुळे आजूबाजूच्या जमीन धारकाचे सेवासुविधा बाधित होता कामा नये .

८)जागेच्या सभोवती वृक्षारोपण करणे बंधनकारक राहील

९) सदर जागेचा पोहच रस्ता विकसित करणेची जवाबदारी निवड झालेल्या संस्थेची राहील .

Scanned with OKEN Scanner

१०) सदर ठिकाणी पाण्याची व्यवस्था निवड झालेल्या संस्थेने करणे बंधन कारक राहील .

११) निवारागृह व्यतिरिक्त इतर मंजूर जागेमध्ये जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला च्या मंजूरी नंतरच चारा लागवड करून सदर चारा भटक्या प्राण्याचे निवारागृह मध्ये असलेल्या जनावरांसाठीच वापरणे बंधन कारक राहील इतर कुठेही जनावरांची विक्री करता येणार नाही .तसेच इतर जागेमध्ये इतर बांधकाम किवा कुठलेही अन्य गोष्टी करता येणार नाही .

१२) सदर संस्थेला पशुवैद्यकीय सेवा पुरविणे करीता नजीकच्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थेची डॉक्टर ची सेवा घेण्यात यावी.निवारागृह मध्ये येणाऱ्या tag नसलेल्या जनावराला नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थे कडून TAGGING करून घ्यावे व त्याची नोंद पशुवैद्यकीय संस्थेने NDLM वर करणे बंधनकारक राहील .

१३) भटक्या प्राण्याचे निवारागृहा मध्ये असलेल्या जनावराची विक्री करता येणार नाही तेथील जनावरे कुणाला दत्तक द्यायचे झाल्यास जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समिती (SPCA) जिल्हा अकोला ची मंजुरी असणे आवश्यक राहील.

१४) जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समिती (SPCA) जिल्हा अकोला तसेच पशुसंवर्धन विभाग कधीही तपासणी करू शकतील .तपासणी वेळी करारनामा मध्ये दिलेले सर्व रेकॉर्ड व पशुधन उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील .

१५) सदर जमिनीचा वापर मंजूर प्रयोजानासाठीच करावा अन्य प्रयोजनासाठी केल्याचे आढळ्यास करार रद्द करण्यात येईल.

१६) सदर जागा ताब्यात घेतल्यावर जागेचे संरक्षण व देखभाल करण्यची जवाबदारी निवड झालेल्या संस्थेची राहील त्यासाठी २४ तास रखवालदाराची व्यवस्था निवड झालेल्या संस्थेला करावी लागेल .

१७) जनावरांना लागणारा चारा ,पाणी ,औषधोपचार, लसीकरण, स्वच्छता ,खर्च ,लाईट बिल,लेबर कॉस्ट कॅमेरा असे इतर खर्च स्वतः करणे आवश्यक राहिलं त्यासाठी मार्फत कुठलाही निधी मिळणार नाही .

१८)SPCA द्वारा परिसरातील पशुप्रेमीना मदतीचे आवाहन करण्यात येते त्यावेळी त्याचा प्रचार व प्रसार करावा व मदत किवा दान करणाऱ्यांना SPCA च्या अधिकृत

Scanned with OKEN Scanner

बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील,जेणे करून भटक्या प्राण्याचे निवारागृह चालविताना काही गरजा त्या निधी मधून खर्च करता येईल .खर्च केलेल्या निधीचा हिशोब जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समिती (SPCA) जिल्हा अकोला यांना देणे बंधनकारक राहील .

१९ ) मृत जनावरांचे शव विच्छेदन केल्यानंतर विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने करावी लागेल .

२० ) कुठलीही तक्रार प्राप्त झाल्यास किवा वाद उद्भवल्यास SPCA कमिटी ने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

२१ ) अनामत रक्कम एकूण २ लाख रुपये SPCA च्या खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील .

२२ ) कार्यरत संस्थेला सदर ठिकाणी काम सोडावयाचे असल्यास कमीत कमी ३ महीने आधी SPCA ला कळविणे बंधनकारक राहील.

२३ )सदर अटींचे उल्लंघन झाल्यास निवड झालेल्या संस्थेचा करारनामा रद्द करण्यात येईल.

२४) कापशी तालुका अकोला जिल्हा अकोला येथे अकोला जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला अंतर्गत भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविण्याकरीता बांधकाम करण्यात आलेल्या एकुन २६१*८६ एकुन २२४५० चौरस फुट जागेवर काम करने बंधन कारक राहिल . इतर जागेमध्ये इतर बांधकाम किवा कुठलेही अन्य गोष्टी करता येणार नाही .

वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर कापशी तलाव तालुका जिल्हा अकोला येथील भटक्या प्राण्याचे निवारागृह चालविण्याकरिता अर्ज जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त अकोला यांचे कडे करावे .सदर अर्ज प्राप्त झाल्यावर अंतिम निवड करण्याचा अधिकार SPCA कमिटी चा राहील.

Scanned with OKEN Scanner

खालील सही करणारी संस्था..................................................वर नमुंद केलेल्या १-२४ अटी व शर्ती वाचल्या असून वरील अटी व शर्ती मला मान्य आहेत मी कापशी तालुका अकोला जिल्हा अकोला येथे अकोला जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा अकोला अंतर्गत भटक्या प्राण्याकरीता सेवाभावी तत्वावर निवारागृह चालविन्या करिता इच्छुक आहे .तरी कृपया आमच्या संस्थेला सेवाभावी तत्वावर काम करण्याची संधी देण्यात यावी हि विनंती .

संस्थेचे संचालक यांची
सही

संस्थेचे नाव

Scanned with OKEN Scanner